## संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ

## परिपत्रक

क्रमांक - संगाबाअवि/१/१०९/३-२५२/२०२१ दिनांक - २८ .६.२०२१

**विषय - संचारबंदी कालावधीमधील निर्बंधांबाबत- दि.२८ जून, २०२१ पासून**

संदर्भ - १) मा.जिल्हाधिकारी, अमरावती यांचे आदेश क्र.कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-८६४/२०२१, दि.२६.०६.२०२१

२) कार्यालयीन परिपत्रक क्र.संगाबाअवि/१/१०९/३-१९२/२०२१, दि.१५.६.२०२१

संदर्भांकित आदेशान्वये मा. जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दि. २८ जुन, २०२१ च्या सकाळी ७.०० पासून पुढील आदेशापर्यंत संचारबंदी कालावधीमधील निर्बंधाबाबत निर्देश निर्गमित केले असून त्याची प्रत सोबत जोडली आहे. संदर्भ क्र.१ वरील परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आलेल्या निर्देशानुसार अमरावती जिल्ह्यातील सर्व संलग्नित महाविद्यालयांनी नोंद घेऊन आवश्यक ती कार्यवाही आपल्या स्तरावर करावी.

तसेच संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिक्षेत्रातील इतर जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी यांनी या संबंधी आदेश निर्गमित केल्यास त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

आदेशान्वये-

सहपत्र - संदर्भांकित आदेश

स्वा/-
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**प्रत माहिती करीता सविनय सादर-**

मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, अमरावती

**प्रतीलिपी माहिती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता**

१) प्र.संचालक, मॉडेल डिग्री कॉलेज, बुलडाणा.

२) उपकुलसचिव (मवि), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांना सूचित करण्यात येते की, सदर परिपत्रक सर्व संलग्नित महाविद्यालयांच्या निदर्शनास आणावे.

३) प्रमुख, संगणक केंद्र, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांना सूचित करण्यात येते की, सदर परिपत्रक सहपत्रासह विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावे.

उपकुलसचिव (प्रशा.)
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

2/Data2/2021/PWR/Korder.pmd(32)

## संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ
## परिपत्रक

क्रमांक - संगाबाअवि/१/१०९/३-२५३/२०२१ दिनांक -२८ .६.२०२१

**विषय - संचारबंदी कालावधीमधील निर्बंधांबाबत- दि.२८ जून, २०२१ पासून**

संदर्भ - १) मा.जिल्हाधिकारी, अमरावती यांचे आदेश क्र.कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-८६४/२०२१, दि.२६.०६.२०२१

२) कार्यालयीन परिपत्रक क्र.संगाबाअवि/१/१०९/३-१९१/२०२१, दि.१५.६.२०२१

संदर्भ क्र.१ वरील आदेशान्वये मा. जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दि. २८ जुन, २०२१ च्या सकाळी ७.०० पासून पुढील आदेशापर्यंत संचारबंदी कालावधीमधील निर्बंधांबाबत आदेश निर्गमित केले आहे.

त्यानुषंगाने विद्यापीठातील प्रशासकीय कामकाजासंदर्भात संदर्भ क्र.२ वरील निर्गमित परिपत्रकाच्या अनुषंगाने दिनांक २९ जुन, २०२१ ते पुढील आदेशापर्यंत या कालावधीकरिता खालील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहे.

१) विद्यापीठातील प्रशासकीय व शैक्षणिक विभागाच्या नियंत्रण अधिकाऱ्यांनी / विभाग प्रमुखांनी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना/ शिक्षकांना कार्यालयीन कामकाजाकरीता विभागातील कर्मचाऱ्यांच्या ५० टक्के संख्या ग्राह्य धरुन उपस्थित राहण्याबाबतचे आदेश निर्गमित करावे.

२) नियंत्रण अधिकारी यांनी विभागातील कामकाजाच्या आवश्यकतेनुसार बोलाविण्यात येणार असलेल्या शिक्षक, अधिकारी व कर्मचाऱ्यांची यादी उपकुलसचिव (आस्था.) यांना न चुकता सादर करावी.

३) अत्यावश्यक सेवा (आरोग्य केंद्र, सुरक्षा विभाग, अभियांत्रिकी विभाग पाणी पुरवठा, विद्युत पुरवठा, उद्यान विभाग व इतर सेवा) पुरविणाऱ्या प्रशासकीय विभाग प्रमुखांनी याबाबत त्यांचे स्तरावर योग्य ते नियोजन करावे.

४) कर्मचाऱ्यांनी कार्यालयात येतांना विद्यापीठाने दिलेले ओळखपत्र सोबत ठेवावे. तथापि, ज्या कर्मचाऱ्यांजवळ ओळखपत्र नसेल त्यांना संचारबंदीमुळे कार्यालयात येण्यास अडचण येत असल्यास विभाग प्रमुखांनी आपल्या स्तरावर अधीनस्त कर्मचाऱ्यांना कार्यालयात बोलाविण्यासंदर्भात पत्र द्यावे.

५) मा.जिल्हाधिकारी, अमरावती यांचे संदर्भांकित आदेश सोबत जोडले असून त्यानुसार सर्व संबंधितांनी कार्यवाही करावी.

आदेशान्वये-

स्वा/-
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

सहपत्र - संदर्भांकित आदेश

**प्रत माहिती करीता सविनय सादर-**
मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, अमरावती

**प्रतीलिपी माहिती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता**

१) सर्व शैक्षणिक विभाग प्रमुख/प्रशासकीय अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

२) प्रमुख, संगणक केंद्र, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांना सूचित करण्यात येते की, सदर परिपत्रक सहपत्रासह विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावे.

उपकुलसचिव (प्रशा.)
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

2/Data2/2021/PWR/Korder.pmd(31)

# जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती

कॅम्प अमरावती ४४४ ६०२

(गृह विभाग)

☎: ०७२१-२६६२०२५/२६६२४९३ फॅक्स : ०७२१-२६६२८४३

Email:- homebranch.collamt@gmail.com Website :- www.amravati.nic.in


क्र. कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-८६४/२०२१ दिनांक :२६ /०६/२०२१

वाचा :- १. आपत्ती व्यवस्थापन कायदा-२००५
२. साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७
३. मा. मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील सूचना पत्र क्रमांक:DMU/२०२०/CR.९२/DisM-१ दिनांक ०४/०६/२०२१
४. या कार्यालयाकडील आदेश जा.क्र.कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-८००/२०२१ दि. ०५/०६/२०२१
५. या कार्यालयाकडील आदेश जा.क्र.कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-८१४/२०२१ दि. १५/०६/२०२१
६. मा. मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश पत्र (Levels of Restrictions for Safe Maharashtra) क्रमांक:DMU/२०२०/CR.९२/DisM-१ दिनांक २५/०६/२०२१
७. या कार्यालयाकडील आदेश क्र.कक्ष-२४/नियंत्रण कक्ष/जिआव्यअ/सो ङि आदेश/कार्य/पथक/कावि-११२२/२०२१ दि. ०७/०५/२०२१

## आदेश

**(संचारबंदी कालावधीमधील निर्बंधाबाबत -दिनांक २८ जून २०२१ पासून )**

ज्या अर्थी कोविड-१९ विषाणूच्या संसर्गाचा प्रार्दुभाव झपाटयाने वाढत असल्याने आपात्कालीन उपाययोजनेचा भाग म्हणून संदर्भिय क्र. ३ च्या मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचेकडील (Break The Chain) च्या निर्गमित केलेल्या अधिसूचनेनुसार संदर्भिय क्र. ४ अन्वये संचारबंदी कालावधीतील निर्बधाबाबत तसेच संदर्भिय क्र. ५ अन्वये संचारबंदी कालावधीतील निर्बंधासह सुट बाबतचे आदेश पारीत करण्यात आले होते.

तथापी संदर्भिय क्र. ७ च्या अधिसूचनेनुसार Levels of Restrictions for Safe Maharashtra अंतर्गत पातळी सह निर्बंध लागू करण्यात आले आहे त्यानुसार INSACOG ( कोविड-१९ साथीच्या रोगासंदर्भात संपूर्ण जीनोम अनुक्रमांसाठी प्रयोगशाळेंचा एक समुह) यांनी Delta Plus Variant a Variant of Concern बाबत सूचविल्यानुसार मी शैलेश नवाल, जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, अमरावती मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार संपूर्ण अमरावती जिल्हा हा श्रेणी ३ (Level-३) मध्ये समाविष्ट केल्यानुसार तसेच संदर्भिय क्र. ६ च्या अधिसूचनेनुसार तसेच फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (२) (३) नुसार अमरावती जिल्हयाकरीता दिनांक २८/०६/२०२१ रोजीचे सकाळी ७.०० वाजतापासून ते पुढील आदेशापर्यंत खालील प्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश पारीत करीत आहे.

यापूर्वी संदर्भिय क्र. ४ अन्वये पारीत केलेल्या आदेशातील नमुद केलेल्या सर्व अत्यावश्यक सेवा व त्या व्यतिरिक्त असलेल्या सेवा याकरीता खालील नमुद केल्याप्रमाणे निर्बंधासह सुट लागू राहतील. सदर कालावधीमध्ये निर्बंधासह सुट देण्यात आलेल्या सेवाबाबतचे विवरणपत्र खालीलप्रमाणे

| अ.क्र. | सेवा तपशील | निश्चित करण्यात आलेली वेळ |
|---|---|---|
| १) | सर्व प्रकारची जिवनावश्यक व अत्यावश्यक असलेली किराणा दुकाने, भाजीपाला दुकाने, फळ विक्रेते, डेअरी, बेकरी, मिठाई, खाद्य पेय विक्रेता यांची दुकाने, पिठाची गिरणी, इ. व सर्व प्रकाराची खाद्य पदार्थ विक्रीची दुकाने (कोंबडी, मटन, पोल्ट्री मासे व अंडी यासह) दुग्ध विक्री केंद्रे, दुग्धालय, डेअरी, दुध संकलन केंद्र, दुध वितरण व्यवस्था, पाळीव प्राणी यांची .खाद्यपदार्थ विक्री कृषी सेवा केंद्रे, कृषी निविष्ठांची दुकाने, कृषी प्रक्रिया उद्योगगृहे, शेती अवजारे आणि शेतातील उत्पादनांशी संबंधित दुकाने, सर्व प्रकारची बिगर जिवनावश्यक सेवाअंतर्गत असलेली दुकाने/प्रतिष्ठाने, कृषी संबंधित सर्व प्रकारची कामे, बांधकामे, सर्व | सकाळी ७.०० ते दुपारी ४.०० पर्यंत |

| | | |
|---|---|---|
| | प्रकारची शासकीय रास्त भाव दुकाने चष्म्याची दुकाने, (आठवडयाचे ७ हि दिवस नियमित सुरु) | |
| २) | सर्व प्रकारची बिगर जिवनावश्यक सेवाअंतर्गत असलेली दुकाने/प्रतिष्ठाने (सोमवार ते शुक्रवार नियमित सुरु तसेच शनिवार व रविवार पूर्णत: बंद ) | सकाळी ७.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत |
| ३) | सर्व प्रकारची मद्यागृहे, मद्यदुकाने | सोमवार ते शुक्रवार सकाळी ७.०० ते दुपारी ४.०० व शनिवार व रविवार सकाळी ७.०० ते दुपारी ४.०० पर्यंत घरपोच सेवा फक्त |
| ४) | हॉटेल, रेस्टॉरंट व बार, खानावळ, शिवभोजन थाळी | सोमवार ते शुक्रवार (नियमित) सकाळी ७.०० ते दुपारी ४.०० पर्यंत ५०% आसन क्षमतेसह तसेच सोमवार ते शुक्रवार दुपारी ४.०० ते रात्री ८.०० पर्यंत घरपोच सेवा, शनिवार व रविवार सकाळी ७.०० ते रात्री ८.०० पर्यंत घरपोच सेवा फक्त<br>हॉटेल, लॉजींग, रेस्टॉरेंट मध्ये एकुण क्षमतेच्या ३३% पेक्षा जास्त क्षमतेने निवास करता येणार नाही. |
| ५) | सार्वजनिक ठिकाणे/क्रिडांगणे/मोकळया जागा, उद्याने बगीचे, Morning Walk, सायकलींग | दररोज सकाळी ५.०० ते सकाळी ९.०० पर्यंत |
| ६) | सर्व प्रकारच्या खाजगी आस्थापना/कार्यालये | सोमवार ते शुक्रवार सायंकाळी ४.०० पर्यंत (अपवाद खाजगी बँका, विमा, औषध कंपन्या, सुक्ष्म वित्तिय संस्था, व गैर बँकींग वित्तिय संस्था यांची कार्यालये नियमित सुरु राहतील.) |
| ७) | कार्यालयीन उपस्थिती - शासकीय/निमशासकीय/खाजगी | एकूण उपस्थिती क्षमतेच्या ५०% सह (कोरोना विषयक कामे करणाऱ्या सर्व आस्थापना, कृषी बँक, मान्सूनपूर्व कामाशी संबंधीत यंत्रणा/कार्यालये ही पूर्ण क्षमतेसह सुरु राहतील) |
| ८) | सिनेमागृहे/चित्रपटगृहे/नाटयगृहे/बहुविध चित्रपटगृहे | पूर्णत: बंद राहतील. |
| ९) | क्रिडा व मनोरंजन (सर्व आंतर मैदानी खेळ बंद राहतील फक्त बाहय मैदानी खेळास परवानगी अनुज्ञेय राहील) | बाहेर मोकळया जागेत सकाळी ५.०० ते सकाळी ९.०० पर्यंत |
| १०) | लग्न समारंभ (कॅटरींग/बँडपथक/वधू-वर पक्ष सह)/ सामाजिक/राजकीय, सांस्कृतिक कार्यक्रम/ स्नेहसंमेलने/ मनोरंजनात्मक कार्यक्रम | ५० लोकांच्या उपस्थितीत मंगल कार्यालये/सभागृहे/विवाह स्थळी (कोरोनांच्या नियमांच्या पालनासह) लग्न/विवाह समारंभ/ सामाजिक सांस्कृतिक कार्यक्रम/स्नेहसंमेलने/ मनोरंजनात्मक कार्यक्रम करता येईल. त्या करीता परवानगी मिळविण्याकरीता https://sanvad.in/ हया संकेतस्थळावर जाऊन Event Permission (कार्यक्रम परवानगीसाठी अर्ज करा) या शिर्षकावर क्लीक करुन परवानगी मिळविण्याकरीता ऑनलाईन अर्ज करावा. माहिती भरल्यानंतर आपल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती प्राप्त करण्याकरीता त्याच https://sanvad.in/ संकेतस्थळावरील Check Event Permission Status या शिर्षकावर क्लीक करुन परवानगी मिळाली की नाही याची माहिती करुन घेता येईल. लग्न/विवाह समारंभाकरीता सायंकाळी ५.०० वाजेपर्यंतच परवानगी अनुज्ञेय राहील. इतर नमुद केल्याप्रमाणे सामाजिक, सांस्कृतिक/ मनोरंजनात्मक कार्यक्रमाकरीता सक्षम प्राधिकारी यांची उपरोक्त संकेतस्थळावरुन परवानगी घेण्यात यावी. |

| | | |
|---|---|---|
| ११) | अत्यंविधी | २० लोकांच्या उपस्थितीसह |
| १२) | सभा/बैठका/स्थानिक प्राधीकरण निवडणूक/सहकारी संस्था आमसभा | एकुण उपस्थिती/आसन क्षमतेच्या ५०% सह शक्य असेल तर Zoom App/Online व्दारे मीटींग आयोजित कराव्या. |
| १३) | बांधकाम | फक्त साईट वर असणारे प्रत्यक्ष मजुर अथवा बाहेरुन मजुर आणण्याच्या बाबतीत दुपारी ४.०० पर्यंत |
| १४) | कृषी संबंधित सर्व प्रकारची कामे | दुपारी ४.०० वाजेपर्यंत |
| १५) | जमावबंदी/संचारबंदी (अत्यावश्यक व वैद्यकीय कारणांशिवाय सायंकाळी ५.०० वाजेनंतर बाहेर पडण्यास सक्त मनाई राहील) | जमावबंदी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत, संचारबंदी सायंकाळी ५.०० नंतर |
| १६) | जीम/व्यायामशाळा/सलुन/ब्यूटी पार्लर/स्पा/वेलनेस सेंटर | एकूण क्षमतेच्या ५०% पूर्व नोंदणी (Appointment) सह वातानुकुलीत सेवेस परवानगी नाही (AC not allowed) |
| १७) | सार्वजनिक वाहतूक सेवा | पूर्ण आसन क्षमतेसह वाहतूकीस परवानगी राहील तथापी प्रवासी यांना उभे राहून प्रवास करण्यास मनाई राहील. |
| १८) | मालवाहतूक करीता हालचाल (Cargo Movement) | जास्तीत जास्त ३ लोकांना परवानगी अनुज्ञेय (चालक/मदतनीस व इतर ०१) नियमितपणे पूर्ण वेळ वाहतूक करता येईल (कोविड नियमांचे पालन करुन) |
| १९) | आंतर जिल्हा प्रवासी वाहतूक (खाजगी, कार, टॅक्सी, बस, रेल्वे व्दारा) | नियमितपणे पूर्ण वेळ तथापी जर प्रवासी लेवल ५ (२०% पेक्षा जास्त कोविड पॉजीटिव्हीटी चा रेट आहे अशा जिल्हयामधून) येत असेल तर ई पास आवश्यक |
| २०) | उत्पादन क्षेत्र | नियमितपणे पूर्ण वेळ |

उपरोक्त नमुद केलेल्या विवरणपत्रानुसार जी आस्थापना/दुकाने/प्रतिष्ठाने ही ४.०० वाजेपर्यंत सुरु राहतील असे नमुद केले आहे त्या ठिकाणी काम करणाऱ्या कर्मचारी यांनी सदर सर्व आस्थापना/दुकाने प्रतिष्ठान ही दुपारी ४.०० वाजता बंद झाल्यानंतर त्यांचे घरी ५.०० वाजेपर्यंत पोहचणे आवश्यक राहील. सायंकाळी ५.०० नंतर अत्यावश्यक व वैद्यकीय कारणांशिवाय हालचाल करण्यास सक्त मनाई राहील.

तसेच संदर्भिय क्र. ७ अन्वये कोरोना विषाणूचा प्रार्दुभाव रोखण्याकरीता प्रतिबंधात्मक उपाययोजना अंतर्गत स्वच्छता व सार्वजनिक शिस्तीचे पालन न करणाऱ्या व्यक्तींवर दंडात्मक कार्यवाही करण्याबाबतचे आदेश पारीत करण्यात आले आहे. त्यानुसार

| अनु. क्र. | गुन्हयाचे स्वरुप | प्रथम आढळल्यास करावयाची कार्यवाही | दुसऱ्यांदा आढळल्यास करावयाची कार्यवाही | कार्यवाही करणारा विभाग | कार्यवाही कोणावर |
|---|---|---|---|---|---|
| १. | सार्वजनिक स्थळी चेहऱ्यावर मास्क न वापरणे | रु. ७५०/- | फौजदारी कार्यवाही करणे | स्थानिक स्वराज्य संस्था (म.न.पा., न.पा.,नपं, ग्रा.पं.) | संबंधित व्यक्तींवर |
| २. | सामाजिक अंतर(Socail Distancing) न राखल्यास | रु. ३५०००/- | फौजदारी कार्यवाही करणे | स्थानिक स्वराज्य संस्था (म.न.पा., न.पा.,नपं, ग्रा.पं.) | दुकाने/प्रतिष्ठाने आस्थापना |
| ३. | मंगल कार्यालयामध्ये लग्नसमारंभ करीता ५० पेक्षा जास्त उपस्थिती आढळून आल्यास | रु. ५०,०००/- | फौजदारी कार्यवाही तसेच पुढील ४ महिन्यांकरीता संबंधित लॉन/हॉल/मंगल कार्यालय सीलबंद करणे | स्थानिक स्वराज्य संस्था (म.न.पा., न.पा.,नपं, ग्रा.पं.) | संबंधित लॉन/हॉल/ मंगल कार्यालय व्यवस्थापक/ चालक/मालक |

उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे दंडात्मक कारवाई करावी. सदरची कारवाई ही संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था यांनी करावी. या व्यतिरिक्त संदर्भिय क्र. ७ च्या आदेशान्वये नमुद करण्यात आलेल्या इतर दंडात्मक कारवाई हया जैसे थे लागू राहतील.

सर्व खाजगी व सार्वजनीक वैद्यकीय सेवा, पशुचिकीत्सा सेवा, त्यांचे नियमीत वेळेनुसार सुरु राहतील सर्व मेडीकल स्टोअर्स, औषधी दुकाने, औषधालये व दवाखाने तसेच ऑनलाईन औषध सेवा २४ तास या कालावधीत सुरु राहतील सर्व

नागरिक/आस्थापना यांनी कोरोना संक्रमण साखळी तोडण्याकरीता आपआपल्या स्तरावरुन खालीलप्रमाणे पंचसुत्री पध्दतीचा वापर करावा आणि याचा जास्तीत जास्त प्रचार करावा.

१. मास्कचा वापर
२. सामाजिक अंतर (Social Distancing),
३. सॅनीटायजर,
४. लसीकरण,
५. टेस्टींग (Testing) व आयसोलेशन (Isolation)

तसेच सर्व नागरिकांनी लसीकरण करणे आवश्यक असून लसीकरण झालेले नसल्यास कोविडची लक्षणे दिसून येत असल्यास तात्काळ RT-PCR चाचणी वेळोवेळी करुन घ्यावी. स्थानिक प्रशासनाने (मनपा/नगर परिषद/नगरपालीका/ग्रामपंचायत) यांनी गर्दीच्या ठिकाणी RT-PCR चाचणी ची व्यवस्था करुन गर्दी कमी होईल याची दक्षता घ्यावी तसेच बाहेर जिल्हयातून प्रवेश करणाऱ्या व्यक्तींची RT-PCR चाचणी करण्यात यावी.

सदर आदेशाचा भंग करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने भारतीय दंड संहिता- १८६० च्या कलम १८८ अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे असे मानण्यात येईल व संबंधितावर सदर कलमानुसार कारवाई करण्यात येईल अशा व्यक्ती, संस्था, संघटना यांचेवर गुन्हे दाखल करण्यासाठी संबंधित पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक दर्जापेक्षा कमी नाही अशा अधिकाऱ्यास या आदेशाव्दारे पुढील आदेशापर्यंत प्राधिकृत करण्यात येत आहे.

सदरचे आदेश हे दिनांक २८/०६/२०२१ चे सकाळी ७.०० वाजतापासून पुढील आदेशापर्यंत संपूर्ण अमरावती शहर व जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागाकरीता लागू राहतील.

या आदेशाची मोठया प्रमाणात जनजागृती करावी व स्थानिक प्रशासन, पोलीस विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था यांनी प्रसिध्दी देऊन कार्यवाही करावी.

(शैलेश नवाल)
**जिल्हादंडाधिकारी अमरावती**

**प्रतिलिपी:-**

१. मा. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांना माहितीकरीता सविनय सादर.
२. मा. पोलीस आयुक्त (शहर) यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
३. पोलीस अधिक्षक (ग्रामीण) अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
५. आयुक्त, महानगरपालीका अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
६. मुख्य वनसंरक्षक, वन विभाग अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
७. कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता.
८. प्रादेशिक परिवहन अधिकारी, अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
९. अधिक्षक, राष्ट्रीय महामार्ग पोलीस, अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता.
१०. पोलीस वाहतूक शाखा (शहर/ग्रामीण) अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता
११. उपविभागीय दंडाधिकारी ---------------------------(सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीस.
१२. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी ---------------------------(सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीस
१३. मुख्याधिकारी नगर परिषद/पंचायत ---------------------------(सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीस
१४. जिल्हा माहिती अधिकारी अमरावती- **सदर आदेशास अमरावती जिल्हयामधील स्थानिक वृत्तपत्रातून प्रसिध्दी देण्यात यावी.**
१५. अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.
१६. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता
१७. विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता.
१८. सहा. आयुक्त (कामगार/अन्न व औषधी प्रशासन/समाज कल्याण विभाग) यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.

**जिल्हादंडाधिकारी अमरावती**